# बृहन्मुंबई महानगरपालिका

## दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह

दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे व महापालिकेने स्वत: बांधलेले पहिले बंदिस्त नाट्यगृह आहे. दिनांक 16 जुलै 1978 पासून हे नाट्यगृह कार्यान्वित झाले. मराठी संगीत रंगभूमी वरील श्रेष्ठ अभिनेते तसेच ह्या युगातील चिरंजीव आवाज कै. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ह्या नाट्यगृहाचे "दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह " असे नामकरण करण्यात आले.

संपूर्ण वातानूकुलित असलेल्या या नाट्यगृहाची एकूण आसनक्षमता 916 आहे. अनामत व भाडे शुल्काच्या अनुसूचीत रकमेचा भरणा करुन सदर नाट्यगृहाचे - नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम इ. सादर करण्याकरिता आरक्षण करता येते. नाट्यगृहामध्ये एक तालीम कक्ष, एक चर्चासत्र सभागृह, व एक बैठक सभागृह उपलब्ध असून त्यांचे संबंधित हेतूकरीता विहित अनामत रक्कम व भाडेशुल्काचा आगाऊ भरणा नाट्यगृहाच्या कार्यालयात करुन आरक्षण करता येते. निमंत्रित/वलयांकित पाहुणे यांच्या आदरातिथ्याकरिता वातानुकूलीत अतिथी कक्ष तसेच नाट्यसंहिता इत्यादी वाचनाकरिता वाचनालय कक्षाची सुविधा विहित शुल्कावर नाट्यगृहामध्ये उपलब्ध आहे. रंगमंचावर आवश्यक असलेले अतिरिक्त नेपथ्य / सामान देखील शुल्कतत्वावर उपलब्ध आहे. नाट्यगृहामध्ये प्रेक्षकांकरीता उपहारगृहाची सुविधा देखील उपलब्ध आहे.

नाट्यगृह प्रभावीपणे कार्यरत राहण्याकरिता जनतेने नियमांचे काटेकोरपणे पालन करुन बृहन्मुंबई महानगरपालिका / नाट्यगृह प्रशासन यांना सहकार्य करावे, अशी अपेक्षा आहे.

रास्त दरामध्ये नाट्यगृह उपलब्ध करून देऊन समाजाची कला व सांस्कृतिक अभिरूची जोपासणे हा नाट्यगृहाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश आहे.